दैनिक

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

मुख्य संपादक : अजश भांगे

बीड/महाराष्ट्र ● गुरुवार, दि.६ फेब्रुवारी २०२५ ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष २ रे ● अंक-११२ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

## साई संस्थानचा मोठा निर्णय कर्मचाऱ्यांच्या कामाची वेळ बदलली

**अहिल्यानगर** –शिर्डीतील साई संस्थानच्या कर्मचाऱ्यांची हत्या झाल्यानंतर आता संस्थानच्या वतीने काही महत्त्वाचे बदल करण्यात आले आहेत. त्यानुसार कर्मचाऱ्यांच्या कामाची वेळ बदलण्यात आली आहे. कर्मचाऱ्यांना सकाळी चार ऐवजी आता सकाळी सहा वाजता कामावर यावे लागणार आहे. त्याचबरोबर या हत्याकांडात मयत झालेल्या कर्मचाऱ्यांना विमा पॉलिसीच्या सर्व सुविधा मिळवून देण्यासाठी साई संस्थानच्या वतीने प्रयत्न केले जाणार असल्याचे सांगण्यात आले आहे. संस्थानच्या वतीने घेण्यात आलेल्या वेळापत्रक बाबतच्या या निर्णयाची अंमलबजावणी ही आजपासूनच होणार आहे.शिर्डीच्या साई संस्थानच्या २ कर्मचाऱ्यांची चाकूने भोसकून निर्घृणपणे हत्या करण्यात आली होती. सोमवारी पहाटे दोन वेगवेगळ्या ठिकाणी या घटना घडल्या. या घटनेत अन्य एक तरुण गंभीर जखमी झाला आहे. या हत्याकांडामुळे शिर्डी चांगलीच हादरली होती. या संदर्भात साई संस्थानच्या वतीने घेण्यात आलेला हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे.सुभाष साहेबराव घोडे व नितीन कृष्णा शेजुळ अशी मृत कर्मचाऱ्यांची नावे आहेत. तर कृष्णा देहरकर असे गंभीर जखमी तरुणाचे नाव आहे. कृष्णावर स्थानिक रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

# फडणवीस बाहुबली तर मी शिवगामिनी पंकजा मुंडे यांचे आष्टीत जोरदार भाषण

**बीड (वृत्तसंस्था)**

आमदार सुरेश धस यांच्या आष्टी मतदारसंघातील खुंटेफळ साठवण तलाव प्रकल्पाचे लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले आहे. या लोकार्पण सोहळ्यानंतर भाजप नेत्या पंकजा मुंडे यांनी भाषण केले आहे. यावेळी बोलताना त्यांनी आमदार सुरेश धस यांना मिश्किल टोला देखील लगावला आहे.

या जिल्ह्याचे आमदार ज्यांना २००९ मध्ये पहिला गुलाल लागला तो भारतीय जनता पक्षाकडूनच लागला ते आता पुन्हा २०२४ मध्ये आमदार म्हणून निवडून आले आहेत आणि ज्यांनी या सभेचे आयोजन करण्यासाठी मोठा सहभाग घेतला आहे ते म्हणजे सुरेश धस, असे म्हणत पंकजा मुंडे यांनी आमदार सुरेश धस यांचा उल्लेख केला आहे.पंकजा मुंडे म्हणाल्या, देवेंद्र फडणवीस यांच्या बद्दल नेहमीच आदरभाव आहे. मात्र आज त्यांच्याबद्दल ममत्त्व भाव निर्माण होत असल्याचे पंकजा मुंडे यांनी म्हटले आहे. आज फडणीसांना बाहुबली म्हणणारे पूर्वी मला शिवगामिनी म्हणत होते. त्यामुळे माझे वचनच माझे शासन आहे, असे देखील पंकजा यांनी म्हटले आहे. बोलणार एक आणि करणार एक हे माझ्या रक्तात नाही. मी गोपीनाथ मुंडे यांची लेक आहे. हे लक्षात ठेवा, अशा शब्दात मंत्री पंकजा मुंडे यांनी सुरेश धस यांना प्रत्युत्तर दिले आहे. सुरेश धस यांना मी आज देखील अण्णाच म्हणते, असं देखील पंकजा मुंडे यांनी म्हटले आहे.दरम्यान, गोपीनाथ मुंडेंएवढा पहाडासारखा माणूस याच जिल्ह्याने महाराष्ट्राला दिल्याचेही सुरेश धस यांनी म्हटले. तसेच, शिरुर आणि पाटोदा तालुक्यासाठी आणखी ३.७ टीएमसी पाणी देण्याची मागणी केली. देवेंद्र बाहुबली हेच आमचं काम करु शकतात, तुमच्याकडूनच आम्हाला अपेक्षा आहे, असे म्हणत ही योजना मंजूर झाल्यास मी जिवंत राहिल किंवा नाही, पण या मतदारसंघातून भाजपचाच आमदार राहिल, असे आश्वासन आमदार सुरेश धस यांनी दिले आहे.



# इराणमध्ये बेपत्ता झालेला वसमतचा अभियंता सुखरूप मायदेशी

### खा.डॉ.अजित गोपछडे यांनी परराष्ट्रमंत्र्यांसह पंतप्रधानांकडे केला होता सुटकेसाठी पाठपुरावा

**नांदेड । हानुमंत चंदनकर**

हिंगोली जिल्ह्यातील वसमत येथील उद्योजक अभियंता योगेश पांचाळ हे इराणमध्ये बेपत्ता झाले होते. बेपत्ता झालेल्या अभियंता पांचाळ यांचा शोध घेऊन त्यांना मायदेशी सुखरूप आणण्यात आले आहे.यासाठी खा.डॉ. अजित गोपछडे यांनी परराष्ट्रमंत्र्यांसह पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडेही सातत्याने पाठपुरावा केला होता. इराणच्या दूतावासाकडेही खा. गोपछडे यांनी संपर्क साधला होता. खा. डॉ. गोपछडे यांच्या प्रयत्नांमुळे मराठवाड्याचा भूमिपुत्र बेपत्ता झालेला अभियंता योगेश पांचाळ हा सुखरूप घरी पोहोचला आहे.

वसमत येथील उद्योजक अभियंता योगेश पांचाळ हे दि. ५ डिसेंबर २०२४ रोजी इराणमध्ये गेले होते. इराणमध्ये काही नवे उद्योग भारतात आणण्याच्या अनुषंगाने ते अभ्यास करीत असतांना इराण पोलिसांनी पांचाळ यांना ताब्यात घेतले. त्यानंतर त्यांना तुरूंगात ठेवण्यात आले. वसमत येथील तरुण अभियंता इराणमध्ये बेपत्ता झाल्याचे समजताच खा. डॉ. अजित गोपछडे यांनी केंद्रीय परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर, राज्यमंत्री पवित्रा मार्गेरिटा आणि परराष्ट्र राज्यमंत्री किर्तीवर्धन सिंह व देशाचे कणखर नेतृत्व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे निवेदन दिले. सदरील बेपत्ता अभियंत्याचा शोध घेऊन त्याला मायदेशी परत आणावे अशी विनंती केली. याचवेळी इराणच्या दूतावासाशी संपर्क साधला.



अखेर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर, राज्यमंत्री पवित्रा मार्गेरिटा, कीर्तीवर्धन सिंह यांच्या प्रयत्नांतून बेपत्ता झालेला वसमतचा उद्योजक अभियंता योगेश पांचाळ यांना भारतात सुखरूप आणण्यात आले आहे. आज त्यांचे मुंबई विमानतळावर आगमन झाले. खा.डॉ. अजित गोपछडे यांनी अभियंता योगेश पांचाळ याच्या शोधासाठी आणि त्याला सुखरूपपणे भारतात आणण्यासाठी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर यशस्वी प्रयत्न केल्याने पांचाळ कुटुंबियांनी सुटकेचा निःश्वास सोडला आहे, तर खा. डॉ. अजित गोपछडे यांचे आभार मानले आहेत. इराणमधून बेपत्ता अभियंत्याला सुखरूप भारतात आणल्याबद्दल खा.डॉ. अजित गोपछडे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह भारत सरकारचे आभार मानले आहेत.

## हनुमान वस्ती शाळेला अखेर दुरुस्ती मधुन मिळाले छत-डॉ.गणेश ढवळे



**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील लव्हूरी केंद्रामधील जिवाचीवाडी ग्रामपंचायत अंतर्गत जिल्हापरिषदेच्या हनुमान वस्ती शाळा ही गावा पासुन पाच किलोमीटर अंतरावर दुर्गम व डोंगरी भागात आहे.शाळेला तब्बल अकरा वर्षांनंतर सुरक्षित छप्पर मिळाले आहे.पावसाळ्यात शाळा गळत असल्यानेपावसाचा अंदाज बघुन जवळपास निवारा नसल्याने शाळेला सुट्टी द्यावी लागत असे. जिल्हा प्रशासन आणि शिक्षण विभागाशी पाठ पुरावा केल्यानंतर अखेर गंजलेले,छिद्र पडलेले पत्रे बदलुन नवे पत्रे टाकण्यात आले आहेत.डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या मागणीचे गांभीर्य लक्षातघेत सरपंच श्रीमती प्रेरणा दिपक काळे, ग्रामविकास अधिकारी महिंद्र मोहन मुंडे ग्रामपंचायत,जिवाचीवाडी यांच्या १५ व्या वित्त आयोगातुन १ लक्ष रुपये निधी तात्काळ वर्ग केल्याने शाळेचे छत(पत्रे) दुरुस्ती झाल्याने डॉ. गणेश ढवळे यांचे वस्ती वरील पालक वर्गाकडून अभिनंदनाचा वर्षाव तर शिक्षकांनी आभार मानले आहेत.शाळेला छत मिळाल्यामुळे विद्यार्थी आनंद व्यक्त करीत आहेत.

## नायगाव ग्रामीण रूग्णालयात कर्करोग दिन साजरा

**नांदेड । हानुमंत चंदनकर**

सव्युक्त आरोग्य सेवा व अभियान संचालक मुंबई यांच्या आदेशानुसार व जिला शल्य चिकित्सक डॉ.नीलकंठ भोसीकर साहेब यांच्या आदेशावरून व ग्रामीण रुग्णालय नायगावचे वैदयकिय अधीक्षक डी. अपर्णा पुपलवाड मैडम यांच्या मार्गदर्शना झाली मंगळवार (ता.४) रोजी ग्रामीण रुग्णालय नायगाव येथे कर्करोग (कॅन्सर) दिन साजना करण्यात आला.




कार्यक्रमाचे अध्यक्ष ग्रामीण वैदयकिय अधीक्षक डॉ.अपर्णा पुपलवाड मैडम डॉ तानाजी लवटे. डॉ . कीर्ती काळे, डॉ. प्रवीण अभोरे डॉ . राजेंद्र लोंढे आयुष डॉ. जावेद सलीम उपस्थित होते. कार्यक्रमात रुग्णांना व नातेवाईकांना कॅन्सर संबधित काव्य लक्षणे व उपचार बाबत जागरूकता करून कॅन्सर या रोगा बदल माहिती देण्यात आली. त्यात ओरल चेक अप , ब्रेक्ट स्कैनिंग व पैप्समेअर त्या तपासण्या करण्यात आळ्या. या कार्यक्रमात एकजुट होवू या कर्करोगाला हरवूया आशा घोषणाही देण्यात आल्या, यावेळी इन्चार्ज सिस्टर शेख गौसीया श्री. शिवाजी भुताळे. रोहिणी हणमंते, राज रक्षेशमारे श्री गंगाधर कौके आदी कर्मचारी उपस्थित होते. आरोग्य संस्थेमार्फत १ फेब्रुवारी ते १६ फेब्रुवारी या कालावधीमध्ये कर्करोग जनजागृती मोहिम राबविण्यात येणार आहे. या अंतर्गत कर्करोग सबंधित रूग्णांना BIOPSY, VI-, ONE.CBE etc संधर्भात आरोग्य तपासणी करण्यात येणार आहे.

## शिवसेना महीला आघाडीच्या शहरप्रमुख सौ.वैशालीताई सांगळे यांच्या वतीने हळदी कुंकवाचा कार्यक्रम संपन्न

**केज । प्रतिनिधी**

केज शिवसेना महिला आघाडीच्या वैशालीताई सांगळे शहरप्रमुख केज यांच्या वतीने घेण्यात आलेला हळदी कुंकवाचा कार्यक्रम गणेशनगर येथे घेण्यात आला या कार्यक्रमात उपस्थित महीलामध्ये सामाजिक कार्यकर्त्या ज्योतीताई सांबरे,केजच्या नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड तसेच मोठ्या संख्येने महिलांनी उपस्थिती लावली होती. महीलांसाठी सुरसंगम कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. सर्व महिलांना एक छोटीशी भेटवस्तु तसेच अल्पोपहार देण्यात आला व पूर्ण महिलांनी आनंद लुटला आपल्या या सर्व धावत्या दगदगीच्या व्यस्त जीवनातून हळदीकुंकु कार्यक्रमासाठी वेळ काढला आणि आपल्या




एका छोट्याशा निमंत्रणा वर उपस्थित राहिल्या बद्दल मी सर्वांचे आभार शिवसेना महीला आघाडी केज शहर प्रमुख सौ. वैशालीताई सांगळे यांनी व्यक्त केले आहेत.

# कायदा व सुव्यवस्था पुनर्स्थापित करा अन् उजनीचे पाणी बीडला द्या-खा.बजरंग सोनवणे

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कडे पत्राद्वारे मागणी

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था ढासळली आहे ती पुनर्स्थापित करण्यात यावी,याच बरोबर बीड जिल्ह्यातीलशेतकऱ्यांच्या जीवनात हरितक्रांती करण्यासाठी उजनी धरणातून १० टीएमसी पाणी बीड जिल्ह्यासाठी विशेष बाब म्हणून मंजूर करावे अशी मागणी खा. बजरंग सोनवणे यांनी मुख्यमंत्री देवेंद्रफडणवीस यांच्याकडे खुंटेफळ ता. आष्टी येथील कार्यक्रमात निवेदनाव्दारे केली.

मुख्यमंत्री देवेंद्रफडणवीस यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे,गेल्या काही वर्षांत बीड जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती अत्यंत चिंताजनक बनली आहे. अतिराजकीय हस्तक्षेपा मुळे पोलीस दलाला स्वतंत्रपणे आणि कार्य क्षमतेने कार्य करण्यास अडथळे येत आहेत. स्थानिक पातळीवर पोलीस प्रशासनावर अनावश्यक दबावटाकला जात असून,कायद्याच्या अंमलबजावणीवर त्याचा प्रतिकूल परिणाम होत आहे.यामुळेच इतर सर्व बेकायदेशीर धंदे सोबतच जिल्ह्यात अपहरण, खंडणी,छळ,हत्या आणि इतर गंभीर गुन्ह्यांचे प्रमाण वाढलेले आहे. नागरिकांमध्ये पोलीस दलाविषयी अविश्वासाची भावना निर्माण झाली असून,कायदा व सुव्यवस्था पूर्णपणे ढासळल्याचे चित्र दिसून येत आहे.जिल्ह्यात नवीन उद्योग येण्यास उद्योजकाचा निरुत्साह दिसून येतो.हे बदलणे आवश्यक आहे.तसेच बीड जिल्हा हा कायम स्वरूपी दुष्काळप्रवण क्षेत्रांपैकी एक आहे. सरासरी पर्जन्यमान कमी असल्याने जिल्ह्यातील बहुतांश शेती कोरडवाहू आहे.परिणामी,शेतकरी अडचणीत सापडत असून रोजगारासाठी मोठ्या प्रमाणावर स्थलांतर होत आहे.या परिस्थितीत सिंचनाच्या सोयी वाढवल्यास स्थलांतर थांबेल,शेती उत्पादन वाढेल आणि बेरोजगारी ही कमी होईल.सध्या उजनी धरणातूनअतिरिक्त पाणी नदीमार्गे वाहून जाते.जर त्यातील १० टीएमसी पाणी बीड जिल्ह्यासाठी विशेष बाब म्हणून मंजूर केले गेले तर ते सीना नदीमधून लिफ्ट करून सीना-कोळेगाव प्रकल्प,त्यानंतर अप्पर मांजरा प्रकल्प आणि शेवटी मांजरसुंबा घाटमाथा येथे नेणे शक्य होईल.अशाप्रकारे पाटोदा बीड,केज,धारूर आणि अंबाजोगाई तालुक्यांतील कोरडवाहू भागामधे नैसर्गिक प्रवाहाद्वारे सिंचनाची सोय करता येईल,यामुळे या योजने च्या तांत्रिक आणि आर्थिक व्यवहार्यता तपासण्यासाठी तात्काळ सर्वेक्षण करण्याचे आदेश द्यावेत,बीड जिल्ह्यासाठी विशेष बाब म्हणून १० टीएमसी पाणी मंजूर करावे,या योजनेसाठी आवश्यक निधी आणि मंजुरीस प्राधान्य द्यावे अशी मागणी केली आहे.



कायदा व सुव्यवस्थेसाठी उपाययोजना

१)बीड जिल्ह्यातील पोलीस दलाला राजकीय हस्तक्षेपापासून मुक्त करावे,जेणेकरून ते निष्पक्षपणे आणि नियमा प्रमाणे कार्य करू शकतील.

२)कायदा व सुव्यवस्था राखण्यास अडसर ठरणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांची तसेच कर्मचाऱ्यांची तातडीने जिल्ह्याबाहेर बदली करण्यात यावी.

३)जिल्ह्यात गुन्हेगारी नियंत्रणासाठी स्वतंत्र चौकशी समिती नेमून आवश्यक त्या सुधारणा सुचवाव्यात असे खा. बजरंग सोनवणे यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

## संपादकीय..

# एकनाथ शिंदे पुन्हा उभारी घेणार



गेल्या दीड महिन्यांपूर्वी महाराष्ट्रात झालेल्या विधानसभा निवडणुकांनंतर राज्यातील झपाट्याने बदललेली राजकीय परिस्थिती लक्षात घेता महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तसेच सध्याच्या देवेंद्र फडणवीस सरकारमधील क्रमांक दोनचे उपमुख्यमंत्री आणि शिवसेना या पक्षाचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांच्यासमोर आगामी काळात स्वतःबरोबरच शिवसेनेला पक्ष म्हणून पुन्हा बळकट करत उभारी देण्याचे अवघड आव्हान उभे ठाकले आहे.

महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुका संपन्न झाल्या आणि निवडणूक निकालानंतर राज्याचे मुख्यमंत्रीपद भाजपाकडे आणि त्यातही शिंदे सरकारमधील उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे जाणार हे स्पष्ट झाल्यानंतर त्याचा सर्वाधिक मानसिक परिणाम हा एकनाथ शिंदे यांच्यावर झाला. भाजपाला महाराष्ट्रात रेकॉर्ड ब्रेक १३२ अधिक पाच अपक्ष १३७ आमदारांचे प्रथमच भरगच्च असे पाठबळ मिळाले, तर एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला ५७ आमदारांचे बळ प्राप्त झाले. अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादीला ४१ आमदार विधानसभेवर निवडून आणता आले. उबाठा २०, काँग्रेस १५, तर शरद पवार यांच्या राष्ट्रवादीला अवघ्या दहा जागांवर यश मिळवता आले. या निकालाने महाराष्ट्रातील भाजपा विरोधी महाआघाडीचा सुपडा पूर्णपणे साफ करून टाकला. महाराष्ट्रातील जनतेने महायुतीला तर भरभरून यश दिलेच मात्र त्याचबरोबर भारतीय जनता पक्ष हा स्वबळावर महाराष्ट्रातील सर्वात मोठा पक्ष म्हणून या निवडणुकीत उभारून आला. भाजपाच्या या प्रचंड यशाचे परिणाम ज्याप्रमाणे विरोधी पक्षांवर होत आहेत त्याचबरोबर काही प्रमाणात महायुतीतील घटक पक्षांवर देखील भाजपाच्या या प्रचंड यशाचा परिणाम झालेला दिसत आहे. त्यातही प्रामुख्याने उपमुख्यमंत्री व शिवसेनेचे प्रमुख नेते एकनाथ शिंदे यांच्यावर बदललेल्या राजकीय परिस्थितीचा परिणाम जाणवताना स्पष्टपणे दिसत आहे. बदललेल्या राजकीय परिस्थितीमधून स्वतःला सावरून शिवसेनेला पुन्हा उभारी देण्याचे एक मोठे आव्हान एकनाथ शिंदे यांच्यासमोर उभे आहे. याचे सर्वात प्रमुख कारण आहे ते म्हणजे राज्यात आगामी काळात होऊ घातलेल्या महापालिका नगर परिषद, जिल्हा परिषद आणि पंचायत समिती यांच्या निवडणुका हे आहे.२०१९ पूर्वीची महाराष्ट्रातील राजकीय परिस्थिती आणि २०१९ नंतर व त्यानंतर एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेत उठाव केल्यानंतरची राजकीय स्थिती यामध्ये जमीन आसमानाचा फरक आहे. त्याचप्रमाणे एकनाथ शिंदे हे राज्याचे मुख्यमंत्री झाल्यानंतरची राजकीय परिस्थिती आणि आता महाराष्ट्रात दोन महिन्यांपूर्वी झालेल्या राजकीय सत्ता सारीपटावरील स्थित्यंतरानंतरची परिस्थिती यातही खूप मोठा फरक पडला आहे. देवेंद्र फडणवीस यांचे उपमुख्यमंत्री पदावरून पुन्हा तिसऱ्यांदा मुख्यमंत्री होणे हे जसे मोठे धक्कादायक होते त्याचप्रमाणे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे उपमुख्यमंत्री होणे हे देखील त्यांच्यासाठी अवघड स्थितीतले होते. या अवघडलेल्या स्थितीतून एकनाथ शिंदे हे अद्यापही पूर्णपणे सावरल्याचे दिसून येत नाही. ते सावरण्याचा प्रयत्न जरूर करत आहेत तथापि त्यांची काम करण्याची जी एक पद्धत आहे या कार्यपद्धतीला काहीसा ब्रेक या राजकीय व्यवस्थेमध्ये लागल्याचे दिसते. मुख्यमंत्र्यांप्रमाणे अमर्याद अधिकार आता उपमुख्यमंत्री म्हणून एकनाथ शिंदे यांच्याकडे नाहीत. त्याचबरोबर दुसरीकडे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उबाठामध्ये ज्या भेटीगाठी होत आहेत त्या देखील एकनाथ शिंदे यांच्यासाठी अनुकूल नाहीत. या सरकारमधील दुसरे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यामुळे देखील एकनाथ शिंदे यांची सरकारमध्ये काहीशी कोंडी झाल्यासारखी स्थिती आहे. या सर्व परिस्थितीवर मात करून एकनाथ शिंदे यांना पुन्हा एकदा राज्याच्या राजकारणात स्वतःला आणि त्याचबरोबर शिवसेनेला उभारी आणण्यासाठी कंबर कसून जोमाने उभे राहावे लागणार आहे. अर्थात हे जेवढे वाटते तेवढे एकनाथ शिंदे यांच्यासाठी आता सरळ सोपे आणि साधे राहिलेले नाही. शतप्रतिशत भाजपाचा नारा हा देखील एकनाथ शिंदे यांच्यासाठी आगामी काळात आव्हानात्मक असणार आहे. एकनाथ शिंदे यांचा आगामी काळात पहिलाच मोठा आणि जंगी सामना हा उद्धव ठाकरे यांच्याबरोबर मुंबई महापालिका निवडणुकीतच होणार आहे.मुंबई महापालिका हा उद्धव ठाकरे यांचा श्वास आहे. त्यामुळे भाजपाच्या मदतीने मुंबई महापालिका जिंकणे हे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासाठी अत्यंत आवश्यक आहे. मुंबई महापालिका जर एकनाथ शिंदे हे जिंकून देऊ शकले तरच राज्यातील आणि केंद्रातील सत्तेत त्यांचे स्थान अधिक भक्कम आणि बळकट होऊ शकते. यासाठी एकनाथ शिंदे यांना सर्वात आधी म्हणजे स्वतःमधील नैराश्य हे पूर्णपणे झटकून पुन्हा नव्या उमेदीने सामान्य जनतेसाठी आणि कार्यकर्त्यांसाठी उभे राहावे लागणार आहे. अर्थात हे करत असताना स्वतःच्या भोवती सतत कार्यकर्त्यांची, पदाधिकाऱ्यांची आणि त्याचबरोबर सर्वसामान्यांची प्रचंड गर्दी म्हणजेच सर्वात लोकप्रिय आणि यशस्वी नेता असणे या गोड गैरसमजातून त्यांना लवकरात लवकर बाहेर पडावे लागणार आहे. त्याचप्रमाणे सत्तेतील नेमके संधी साधू कोण आहेत याचा शोध जर का एकनाथ शिंदे हे घेऊ शकले, तर त्यांच्या हाती जे सत्य लागेल ते पचवणे हे त्यांनाही अत्यंत अवघड होऊन बसेल. मात्र या कटू सत्याचा शोध घेण्याचे धाडस हे देखील कधीतरी शिवसेनेसारख्या आक्रमक पक्षाचा मुख्य नेता म्हणून एकनाथ शिंदे यांना करावेच लागणार आहे आणि जर का ते आत्ता करू शकले नाहीत, तर झपाट्याने बदलत असलेल्या राजकीय स्थितीत ही संधी देखील त्यांच्या हातातून गेलेली असेल.सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे आगामी काळात होऊ घातलेल्या मुंबई महापालिका, ठाणे महापालिका, कल्याण-डोंबिवली महापालिका तसेच राज्यातील अन्य महापालिका जिल्हा परिषदा पंचायत समित्या अशा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या त्या-त्या जिल्ह्यातील स्थानिक नेत्यांसाठी सर्वसामान्य शिवसैनिकांसाठीही ज्यांनी उद्धव ठाकरे यांची साथ सोडून एकनाथ शिंदे यांचा हात पकडला आहे. अशा शिंदे समर्थकांसाठी अनन्यसाधारण महत्त्वाच्या आहेत. लोकसभेत खासदारांचे बळ वाढण्यासाठी आणि विधानसभेत अधिकारी आमदार निवडून येण्यासाठी स्थानिक कार्यकर्ते पदाधिकारी आणि त्याचबरोबर महापालिका जिल्हा परिषद पंचायत समिती यांच्यामधील सत्ता ही राज्याच्या आणि देशाच्या राजकारणात मोठी भूमिका बजावत असते. २०२४ च्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीच्या वेळी राज्यात महापालिका आणि जिल्हा परिषदा या अस्तित्वात नव्हत्या. मात्र तरी देखील भाजपा शिवसेना आणि राष्ट्रवादी यांना विधानसभा निवडणुकीत दणदणीत यश मिळाले याचे प्रमुख कारण म्हणजे महायुतीची सत्ता ही राज्यात होती आणि मुख्यमंत्री म्हणून एकनाथ शिंदे यांनी स्थानिक नेतृत्वाला बळकट करण्याबरोबरच त्याला त्या मतदारसंघात पुन्हा नव्याने निवडून येण्यासाठी जे काही पाठबळ द्यावे लागते ते पूर्ण ताकतीनिशी एकनाथ शिंदे यांनी पाठीशी उभे करून दिले होते. २०१४ पासून भाजपाची केंद्रात आणि राज्यात सत्ता असल्यामुळे भाजपाचा संघटना विस्तार हा स्थानिक पातळीवर मोठ्या प्रमाणावर फोफावलेला आहे. त्याचाच मोठा फायदा भाजपाला या विधानसभा निवडणुकीत झाला. हे जर लक्षात घेतले, तर आगामी महापालिका जिल्हा परिषद आणि पंचायत समिती जिंकण्यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पुन्हा नव्याने शिवसेनेला विजयी करण्यासाठी कंबर कसावी लागणार आहे.

# तरच गुन्हेगारीला आळा बसेल

मराठवाड्यातील बीडच्या गुन्हेगारीवरून संपूर्ण महाराष्ट्रात रणकंदन माजले आहे. तसे पहिले तर मराठवाड्यात खरोखरच गुन्हेगारीचे प्रमाण वाढले आहे; परंतु ही गुन्हेगारी केवळ मराठवाड्यापुरती सीमित नाही, तर संपूर्ण महाराष्ट्रात हा प्रकार दिसून येतो. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे गृहखाते असल्याने ते नक्कीच याकडे विशेष लक्ष देतील, यामध्ये दुमत नाही.

अभयकुमार दांडगे



गुन्हेगारी अचानक वाढत नसते. अनेकदा गुन्हेगारीमागे राजकीय वरदहस्त असतो. गुन्हेगारी संपवायची असेल, तर ते शक्यही आहे व अशक्यही आहे. याबाबत अनेकदा वेगवेगळी मतमतांतर समोर येतात. महाराष्ट्राच्या बाबतीत बोलावयाचे झाले तर, सत्ता कोणाची, सत्तेवर कोण, गुन्हेगारविश्वाची चर्चा कशी व कुठपर्यंत यावर देखील कायदा व सुव्यवस्थेच्या बाबतीत बोलता येईल. कुठल्याही राज्यात गुन्हेगारी कमी झालेली नाही. गुन्हेगारी कमी करण्यासाठी पोलीस प्रशासनाला मोकळ्या हाताने काम करू देणे अत्यंत आवश्यक आहे. राजकारणी लोकांचा हस्तक्षेप नसेल तर अनेकदा गुन्हेगारांना फाशीपर्यंत पोहोचविता येते; परंतु अनेकदा गुन्हेगारांना वाचविण्यात राजकारणी लोकांचा हात असतो, अशी ओरड होत असते. अलीकडच्या काळात महाराष्ट्रात गुन्हेगारीने तोंड वर काढल्याने चिंता व्यक्त केली जात आहे.मराठवाड्यातील बीडच्या प्रकरणाने हा विषय अधिक प्रमाणात चर्चेत आला आहे. राज्याचे मंत्री धनंजय मुंडे यांच्याशी जवळीक असलेले वाल्मिक कराड यास अटक करावी, या मागणीसाठी बीडमध्ये मोठा मोर्चा निघाला. बीड जिल्ह्यातील जवळपास सर्वच आमदारांनी हा प्रश्न उचलून धरला. मराठवाड्यातील तुळजापूर जवळील एका सरपंचाला पवनचक्की प्रकरणात अपहरण करण्याचे प्रकरणही ताजेच आहे. या व मराठवाड्यातील इतर प्रकरणांवरून पोलीस प्रशासनावर ताशेरे ओढले जातआहेत. शिवाय पुणे जवळील हडपसरमधील शेतकरी तसेच हॉटेल व्यावसायिक सतीश वाघ यांच्या खून प्रकरणात त्यांची पत्नी मोहिनी वाघ हिला अटक करण्यात आली. पत्नीनेच वाघ यांच्या खुनाची सुपारी दिल्याचे पोलीस तपासातून स्पष्ट झाले आहे. मोहिनीने अक्षय जावळकरच्या मदतीने सतीश वाघ यांचा सुपारी देऊन खून घडवून आणला. सहा महिन्यांपासून पतीला संपविण्यासाठीची तयारी सुरू होती. अक्षय बरोबरच्या संबंधाबद्दल पतीला समजले. त्यानंतर तिने अक्षयला खुनाची सुपारी दिली. या प्रकरणात, मोहिनीला अटक करून न्यायालयात हजर करण्यात आले होते. हे प्रकरण देखील महाराष्ट्रात सध्या चर्चेत आहे. मराठवाडा तसेच महाराष्ट्रातील इतर काही कायदा व सुव्यवस्थेच्या प्रश्नावरून सध्या वेगवेगळी चर्चा केली जात आहे. भारतातील अनेक प्रांतापैकी महाराष्ट्र हे अत्यंत प्रगत, महापुरुषाचे आणि संताची भूमी असलेले राज्य म्हणून ओळखले जाते.

आपला महाराष्ट्र काल परवापर्यंत इतर राज्यांसाठी एक आदर्श राज्य म्हणून चर्चेत होता. अनेकजण महाराष्ट्राच्या राजकारण, समाजकारण, सांस्कृतिक क्षेत्राबद्दल अत्यंत चांगुलपणाने बोलत असते. कधीकाळी उत्तर प्रदेश, बिहार ही राज्ये अधांधुंद, गुन्हेगारीचे राज्ये म्हणून ओळखली जात. गुन्हेगारीचे राज्य असा त्यांचा परिचय होता. अर्थात अनेक गुन्ह्यांच्या आलेखात ती राज्ये वरच्या क्रमांकावर होती, मात्र आता त्या राज्यांना मागे टाकत महाराष्ट्रावरच्या क्रमांकावर आला आहे. राष्ट्रीय गुन्हे अन्वेषण संस्थेच्या वतीने २०२० सालातील गुन्हेगारीच्या संदर्भातील अहवाल नुकताच प्रकाशित करण्यात आला. भारतात एकूण ६६ लाख १ हजार २८५ गुन्ह्यांची नोंद झाली आहे. त्या एकूण गुन्ह्यांपैकी महाराष्ट्राच्या नावावरती ५ लाख ३९ हजार गुन्ह्यांची नोंद झाली आहे. २०१९ पेक्षा २९ हजार ५७० ने अधिकचे गुन्हे एका वर्षात नोंदविण्यात आले आहेत. ही वाढ सुमारे ५.४९ टक्के इतके आहे. राज्याच्या गुन्हेगारीचे प्रमाण सुमारे ८.१७ टक्के इतकी आहे. शंभर लोकांच्या मागे सुमारे नऊ गुन्हे हे विचार करायला भाग पाडत आहेत. देशात बाल गुन्हेगारीचे १ लाख २८ हजार ५३१ गुन्हे नोंदविण्यात आले असून त्यापैकी एकट्या महाराष्ट्रात १४ हजार ३७१ गुन्ह्यांची नोंद आहे. देशात महिलांवरील अत्याचाराचे ३ लाख ७१ हजार ५०३ गुन्ह्यांची नोंद करण्यात आली आहे. उत्तर प्रदेशात ४९ हजार ३८५ गुन्ह्यांची नोंद करण्यात आली असून ते राज्य प्रथम क्रमांकावर आहे. भारतातील आर्थिक गुन्हेगारीच्या संदर्भाने आर्थिक भ्रष्टाचार व गैरव्यवहाराचे संदर्भाने नोंदविण्यात आलेल्या तीन हजार १०० गुन्ह्यांपैकी एकट्या महाराष्ट्रातील ६६४ गुन्ह्यांची नोंद करण्यात आली आहे. हे प्रमाण शेकडा २२ टक्के इतके आहे.भ्रष्टाचारात महाराष्ट्र हे देशातील प्रथम क्रमांकाचे राज्य ठरले आहे. देशात सायबर गुन्हेगारी संदर्भाने ५० हजार ३५ गुन्ह्यांची नोंद करण्यात आली असून महाराष्ट्रात पाच हजार ४९६ गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. भारतात नोंदविल्या गेलेल्या तीस हजार १८३ खुनांच्या गुन्ह्यांपैकी महाराष्ट्रात २ हजार २२९ गुन्ह्यांची प्रकरणे नोंदविण्यात आली आहेत. खुनांच्या बाबतीत महाराष्ट्र देशात दुसऱ्या क्रमांकावर आहे. उत्तर प्रदेश प्रथम क्रमांकावर आहे. ज्येष्ठ नागरिकांवरील अत्याचारात महाराष्ट्रात वाढ झाली असून देशातील २४ हजार ७९४ गुन्ह्यांपैकी एकट्या महाराष्ट्रात ४ हजार ९०९ गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. महाराष्ट्र देशात प्रथम क्रमांकावर आहे. भारतातील अनुसूचित जातीच्या व्यक्तींवर झालेल्या अत्याचारांमध्ये ५० हजार २९१ गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. त्यापैकी २ हजार ५६९ गुन्हे महाराष्ट्रातील आहेत. जमाती संवर्गातील आठ हजार २७२ गुन्हे संपूर्ण भारतात नोंदविण्यात आले आहेत, त्यापैकी ६६३ महाराष्ट्रातील आहेत. राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे गृहखाते आहे. त्यांनी महाराष्ट्रातील विस्कटलेली घडी नीट बसवावी, अशी त्यांच्याकडून महाराष्ट्रातील तमाम जनतेची अपेक्षा आहे. महाराष्ट्रातील जनतेच्या अपेक्षांना ते पूर्णही होतील, परंतु यासाठी थोडासा वेळ नक्कीच लागणार आहे. इतर राजकारण्यांपेक्षा फडणवीस यांची दृष्टी वेगळी व विकासात्मक, नि:स्पृह आहे. त्यामुळे महाराष्ट्रात कायदा व सुव्यवस्थेच्या बाबतीत नक्कीच अच्छे दिन येतील, अशी अपेक्षा करायला हरकत नाही. शेवटी समाजातील जडण-घडण व व्यक्ती तेवढ्या प्रवृत्ती याप्रमाणे सर्वच गोष्टी रोखणे कोणाच्याही हातात नाही.पोलीस कायदा व सुव्यवस्था अबाधीत ठेवण्यासाठी पुढाकार घेऊ शकतात. शेवटी समाजावर कोणाचा तरी धाक असणे आवश्यक आहे. पोलिसांनी त्यांची भूमिका इमानेइतबारे वठविल्यास नक्कीच गुन्हेगारी कमी होऊ शकते. शेवटी समाजात वावरणारे गुन्हेगार व पोलीस एकमेकांना ओळखून असतात, असे अनेकदा बोलले जाते. त्यामुळे पोलिसांनी शेवटी त्यांचा त्यांनीच निर्णय घ्यावा, म्हणजे समाजातून होणारी टीका व त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोण नक्कीच बदलेल, यात आम्हाला तरी शंका नाही. मराठवाड्यात मात्र नक्कीच गुन्हेगारी संपविण्यासाठी गृहखात्याला विशेष पुढाकार घेणे अत्यंत गरजेचे आहे.

# मुंबईला वायू प्रदूषणाचा विळखा

हिवाळा ऋतू सर्वांना हवा हवासा वाटत असला तरी या ऋतूमधील डिसेंबर आणि जानेवारी महिने हवेतील प्रदूषणाला प्रचंड प्रमाणात पोषक असतात. सतत विविध प्रकारची कामे सुरू असलेल्या ठाणे, मुंबईसारख्या शहरांमधील हवेत धुळीचे प्रमाण जास्त प्रमाणात आढळून येते. थंड हवेमुळे वातावरणातील धूळ वर न जाता ती काही फुटांच्या अंतरावर तरंगत राहते. अशा धुळयुक्त हवेचा मानवावर, प्राण्यांवर विपरीत परिणाम होण्याचा धोका असतो. त्यामुळे धुळीसोबतच हवेतील सल्फर डायऑक्साईड, नायट्रॉजन ऑक्साईड आणि इतर विषारी घटकांचे प्रमाण वाढते. देशाच्या आर्थिक राजधानीमध्ये सध्या हेच चित्र पाहायला मिळत आहे. मुंबईनगरीत वायू प्रदूषणाने इतके टोक गाठले आहे की, सध्याची प्रदूषणाची पातळी ही दिवसाला साडेतीन किंवा महिन्याला १०५ सिगारेटच्या धुराइतकी आहे. वाढत्या वायू प्रदूषणामुळे गेले काही दिवस मुंबईतील काही भागांमध्ये मोठ्या प्रमाणात धुरके दिसून येत आहे. हवा विषारी तर झाली आहेच; पण मुंबईचाही श्वास कोंडला आहे. परिस्थिती अशी आहे की, सततच्या प्रदूषणामुळे निर्माण झालेल्या विषारी धुरक्यामुळे रस्त्यांची दृश्यमानता कमी झाली आहे. शहरातील दृश्यमानता दोनशे ते तीनशे मीटर इतकी कमी झाली होती, त्यामुळे जवळपासच्या गगनचुंबी इमारतीही क्वचितच दिसत होत्या. सर्वात आश्चर्याची बाब म्हणजे धुक्यामुळे गेल्या शुक्रवारी दिवसभर सूर्यदेवाचे दर्शनही झाले नाही.



मुंबई शहर आणि उपनगरातील प्रमुख ५ ठिकाणी हवा प्रचंड दूषित आहे. याशिवाय १० ठिकाणची हवा आरोग्यास घातक आहे. हवा गुणवत्ता निर्देशांकाच्या (एक्यूआय) संकेतस्थळावरील माहितीनुसार, काल मालाड, माझगाव, नेव्हीनगर कुलाबा, सिद्धार्थनगर, वरळी आणि वांद्रे-कुर्ला संकुल-बीकेसी येथील एक्यूआय तीनशे पार गेला आहे. या ठिकाणी प्रदूषणाची पातळी अति खराब कॅटेगरीमध्ये नोंदली गेली आहे. या प्रमुख ठिकाणांसह तब्बल ठिकाणची हवा गुणवत्ता निर्देशांक २०० ते ३०० एक्यूआय दरम्यान आहे. ही पातळी आरोग्यास अपायकारक हवेच्या कॅटेगरीमध्ये मोडते. यात वांद्रे-पूर्व, बोरिवली-पूर्व, छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ, देवनार, जुहू, भांडूप-पश्चिम, अमेरिकन वकिलाती कार्यालय- बीकेसी, नेरूळ, सायन, विलेपार्ले आदी ठिकाणांचा समावेश आहे. कमाल तापमानामध्ये घट झाल्याने हवेतील आर्द्रता वाढत आहे. त्यामुळे वातावरणातील धुळीचे कण त्याच स्थितीत राहतात. समुद्रातून येणाऱ्या वाऱ्यांमुळे हवेतील आर्द्रता वाढत असल्याचे हवामान खात्याचे म्हणणे आहे. हा आठवडाभर हीच स्थिती कायम राहणार असल्याचा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. मुंबईतील वाढत्या प्रदूषणाला मोठ्या प्रमाणात सुरू असलेली पायाभूत सुविधांची कामे, अनियंत्रित वाहतूक व्यवस्था आदी कारणीभूत आहेत. मुंबईत सध्या एकाच वेळी मोठ्या प्रमाणावर पायाभूत सुविधांच्या निर्मितीची कामे सुरू आहे. त्यात मेट्रो आणि कोस्टल रोडच्या कामाचाही समावेश आहे. याशिवाय दर अर्ध्या किलोमीटरवर गगनचुंबी इमारतीचे बांधकाम सुरू असल्याचे पाहायला मिळत आहे. अनेक ठिकाणी बांधकाम सुरू असताना आणि जुने बांधकाम पाडताना प्रचंड धुळ उडते. तोडकाम करताना सदर जागेसभोवती हिरवा कपडासभोवती बांधण्याच्या सूचना महापालिकेकडून देण्यात आलेल्या आहेत. मात्र फार कमी लोकांकडून त्याची अंमलबजावणी होते. मागील काही दिवसांमध्ये महापालिकेने अशा जवळपास ९०० बांधकाम ठिकाणांची पाहणी करून नियम मोडणाऱ्या २८ विकासकांवर कारवाई केली आहे.

उघड्यावर डेब्रिज वाहून नेणाऱ्या वाहनांवर महापालिकेने महिनाभरात मोठी कारवाई करताना जवळपास १२ लाख रुपयांचा दंडही वसूल केला आहे. मुंबईत २५० पेक्षा अधिक स्मशानभूमी आहेत. यातील बहुतांश स्मशानभूमीमध्ये अजूनही लाकडांचा वापर केला जातो. या धुरामुळे प्रदूषणात वाढ होत असल्याने लाकूड आधारित ४१ स्मशानभूमींचे इलेक्ट्रिक किंवा पीएनजी आधारित दहनभूमीत रूपांतरण करण्यात येत आहे. भविष्यात अधिकाधिक स्मशानभूमींचे अशाप्रकारे रूपांतरण करण्याचा पालिकेचा मानस आहे. मुंबईत सध्या १२ लाखांपेक्षा जास्त खासगी कार आहेत. त्यामुळे रस्त्यांवर वाहतूक नेहमी ठप्प झालेली दिसून येते. इच्छित स्थळी जाण्यासाठी दुप्पट वेळ लागत आहे. रस्त्यावर सतत धावणाऱ्या वाहनांमुळे प्रदूषणाची पातळी वाढत आहे. अनियंत्रित वाहतूक व्यवस्थेचाही थेट परिणाम प्रदूषण वाढीवर होत आहे. समुद्रातील तापमानात घट, उंच इमारतींमुळे हवेचा बदललेला पॅटर्नही वायू प्रदूषणाला खतपाणी घालत आहे. गगनचुंबी इमारती समुद्रातील वाऱ्यांना त्यांचे काम करू देत नाहीत. ऑक्टोबर हिट आणि मान्सून परतण्यास लागलेला उशीर हेही एक कारण आहे. थंडीचे कमी-अधिक प्रमाण तसेच वाढते प्रदूषण पाहता श्वसनाशी संबंधित रोगांचा प्रादूर्भाव वाढला आहे. त्याचा सर्वाधिक त्रास लहान मुलांसह महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना होत आहे. थंडीपासून दूर राहण्यासाठी उबदार कपडे घालावेत. शक्य असल्यास थंड हवामान टाळा.थंड पदार्थांचे सेवन मर्यादित असावे. विशेषतः कोणत्याही आजाराची लक्षणे दिसू लागल्यास न डगमगता तातडीने महापालिकेच्या किंवा खासगी रुग्णालयातील डॉक्टरांशी संपर्क साधावा, असे महापालिकेतर्फे सांगण्यात आले आहे. राजधानी दिल्लीप्रमाणे मुंबईची हवा प्रदूषित होऊ नये यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ सतर्क आहे. हवेमधील प्रदूषणाचे प्रमाण ओळखून त्यावर त्वरित उपाययोजना करण्यासाठी प्रदूषण नियंत्रण मंडळाने निरंतर हवा तपासणी यंत्र बसवले आहेत. याशिवाय मुंबई महापालिकेकडून रस्ते पाण्याने धुऊन काढले जात आहेत. प्रदूषण रोखण्यासाठी पालिकेकडून हरतरेचे प्रयत्न केले जात असले तरी नियम मोडणाऱ्यांविरोधात आणखी कडक कारवाई करण्याची गरज आहे.

# अंबाजोगाईत निघाली कॅन्सर जनजागृती रॅली

## कॅन्सरचा वाढलेला विळखा चिंताजनक-डॉ.प्रियंका राठोड

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई शहरात जागतिक कॅन्सर डे च्या निमित्ताने भारतीय जैन संघटना व आयएमए अंबाजोगाई, रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य अशी जनजागृती रॅली काढण्यात आली.

या रॅलीद्वारे सामाजिक संदेश देण्यात आला व विविध घोषणांनी अंबाजोगाई शहर दणाणून गेले. राष्ट्रीय कॅन्सर डे च्या निमित्ताने सामाजिक संवेदना जिवंत ठेवत आणि भारतात वाढत असलेले कॅन्सरचे प्रस्थ हे चिंताजनक असून याला प्रतिबंध घालता यावा. यासाठी शहरातीलभारतीय जैन संघटना, आयएमए संघटना, रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी आणि, कै बाबुराव घुले नर्सिंग कॉलेज, कै प्रमोद जी महाजन नर्सिंग कॉलेज, शासकीय नर्सिंग कॉलेज, लोखंडी, वेंकटेश नर्सिंग कॉलेज, आशा वर्कर्स, अस्तित्व महिला संघटन, अंबाजोगाई इ. च्या पुढाकाराने जनजागृती रॅली काढण्यात आली.

या रॅलीचे उद्घाटन ज्येष्ठ समाजसेवक नंदकिशोर मुंदडा व लातूर येथील प्रसिद्ध कॅन्सररोग तज्ञ डॉ. प्रियंका राठोड मॅडम यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी आयएमएचे अध्यक्ष डॉ.नवनाथ घुगे, आयएमएचे सचिव




डॉ.सचिन पोतदार ,रोटरीचे जिल्हा सचिव सतीश लोणीकर, रोटरी अंबाजोगाई चे अध्यक्ष रो. कल्याण काळे, सचिव धनराज सोळंकी, तसेच भारतीय जैन संघटनेचे अध्यक्ष साहिल मुथा,सचिव आदेश कर्नावट यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

पांढऱ्या रंगाची फीत कापून या कॅन्सर डे जनजागृती रॅलीचे उद्घाटन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेले कॅन्सर जनजागृतीचे फलक घेतले हाती घेतलेले होते. विविध घोषणा या ठिकाणी दिल्या जात होत्या. तर एलईडी व्हन द्वारे चौकाचौकात व अबाजोगाईतील शाळेत जावुन व्हिडिओच्या माध्यमातून जनजागृती केली जात होती. ही रॅली अंबाजोगाई शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथून सरू होऊन स्वातंत्र्यवीर सावरकर चौक, सायगाव नाका, जुना पेट्रोल पंप, छत्रपती शिवाजी महाराज चौक ते संत मुकुंदराज सांस्कृतिक सभागृह या ठिकाणी या रॅलीचा समारोप करण्यात आला.

रॅलीच्या उद्घाटन प्रसंगी लातूर येथील कॅन्सर रोग तज्ञ डॉ. प्रियंका राठोड यांनी उपस्थितांना महत्त्वपूर्ण सूचना करून प्रत्येकाने आता कॅन्सरची काळजी घेतली पाहिजे असे सांगितले. आयएमएचे अध्यक्ष डॉ. नवनाथ घुगे यांनी मार्गदर्शन केले. या रॅलीत आयएमएचे अध्यक्ष डॉ. नवनाथ घुगे, सचिव डॉ. सचिन पोतदार डॉ. सुधीर धर्मपात्रे, रोटरीचे ओमकेश दहिफळे, डॉ. अनिल केंद्रे, स्वप्नील परदेशी, भीमाशंकर शिंदे, अंगदराव कराड, डॉ.निशिकांत पाचेगावकर, राजेंद्र घोडके, जगदीश जाजू, गणेश राऊत, डॉ.सुरेश आरसुडे ,स्वरूपा कुलकर्णी, बालाजी घाडगे , संतोष मोहीते , अजित देशमुख, तसेच भारतीय जैन संघटनेचे प्रवीण सोळंकी, निलेश मुथा , संतोष डागा, जवाहर मर्लेचा , विजय बडेरा, मयूर बडेरा, पियुष मुथा, उदय रूपडा, मीना डागा, सुनीता कात्रेला तसेच शहरातील प्राथमिक आरोग्य केंद्र असेल उपकेंद्र असेल व रुग्णालयातील सर्व डॉक्टर्स,स्टाफ नर्स, आरोग्य सेविका सेवक शिवाय विविध नर्सिंग महाविद्यालयाचे विद्यार्थी व त्यांचे प्राचार्य आणि कर्मचारी वृंद मोठ्या संख्येने या रॅलीत सहभागी झाले होते. या ठिकाणी आयएमएचे अध्यक्ष डॉ. नवनाथ घुगे यांनी मार्गदर्शन केले.तर धनराज सोलंकी यांनी आभार मानले.


# पुण्यात GBS चा धुमाकूळ परिस्थिती हाताबाहेर?

**शिरूर । प्रतिनिधी**

पुणे शहरात सध्या गुइलेन-बॅरी सिंड्रोम (GBS) या आजाराच्या रुग्णांची संख्या झपाट्याने वाढत आहे. पुण्यासह आसपासच्या गावातही या आजाराचे रुग्ण आढळून येत असल्यामुळे पुणेकरांची चिंता वाढली आहे.

रविवारी पुण्यात GBS चे तीन नवे रुग्ण आढळले असून, त्यामुळे एकूण रुग्णांची संख्या १५८ वर पोहोचली आहे. यातील २१ रुग्णांची प्रकृती गंभीर असून ते व्हेंटिलेटरवर उपचार घेत आहेत.

दुषित पाण्यामुळे रुग्णांची संख्या वाढत असल्याची शंका प्रशासनाला आहे. या आजाराचे मूळ शोधण्यासाठी प्रशासनाकडून प्रयत्न सुरू आहेत. यासाठी सिहगड परिसरातील पाण्याचे नमुने प्रयोगशाळेत पाठवण्यात आले आहेत. मात्र, अद्याप रुग्ण वाढीचे कारण समजू शकलेले नाही.



पुण्यातील एकूण ऋड्ड रुग्णांपैकी ३१ रुग्ण पुणे महापालिका क्षेत्रातील आहेत, तर ८३ रुग्ण सिहंगड रोड, किरकिटवाडी, नांदोशीसह आसपासच्या काही गावांमधील आहेत. १८ रुग्ण पिंपरी-चिंचवडमधील आणि १८ रुग्ण पुणे ग्रामीण भागातील आहेत, तर आठ रुग्ण इतर जिल्ह्यातील आहेत.

आतापर्यंत ऋड्ड मुळे पाच रुग्णांचा मृत्यू झाला असून ३८ रुग्णांना उपचारानंतर रुग्णालयातून सोडण्यात आले आहे.

# सुपा व पारनेर औद्योगिक वसाहतीतील अतिक्रमणे तातडीने काढण्याचे आदेश - पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील औद्योगिक वसाहतींमध्ये उद्योगस्नेही वातावरण निर्माण करण्यासाठी सुपा व पारनेर औद्योगिक वसाहत क्षेत्रातील अतिक्रमणे तातडीने हटवण्याचे निर्देश राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले.जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात पारनेर औद्योगिक वसाहतीच्या प्रश्नांबाबत आयोजित बैठकीत पालकमंत्री बोलत होते. या वेळी आमदार काशिनाथ दाते, जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर, जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला, पारनेरचे उपविभागीय अधिकारी श्रीकांत चिंचकर, तहसीलदार गायत्री सौंदणे



आदी उपस्थित होते.

पालकमंत्री विखे पाटील यांनी निर्देश दिले की, सुपा व अहिल्यानगर औद्योगिक वसाहतीच्या हद्दीत अतिक्रमण तसेच अनधिकृत टपऱ्यांविरोधात येत्या १५ दिवसांत ठोस कारवाई करावी आणि संपूर्ण परिसर अतिक्रमणमुक्त करावा.तसेच, प्रदूषण नियंत्रण महामंडळ, कामगार विभाग व औद्योगिक विकास विभागाच्या अधिकाऱ्यांनी संयुक्त तपासणी करून प्रदूषण नियंत्रण नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांची माहिती संकलित करावी आणि कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी करावी, असेही त्यांनी सांगितले. औद्योगिक वसाहतीतील कंपन्यांच्या प्रमुखांसोबत बैठकीचे आयोजन करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.या बैठकीस संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

# भंडारा जिल्ह्यासाठी भरीव निधी देण्याचा प्रयत्न-उपमुख्यमंत्री पवार

## सौरऊर्जा, पर्यटन आणि तीर्थक्षेत्र विकासासाठी स्वतंत्र निधी देण्याचा निर्णय

**भंडारा । प्रतिनिधी**

जिल्हा नियोजन समितीद्वारे जिल्ह्यातील विकास कामांना निधी देण्यात येतो .गतवर्षीपेक्षा भंडारा जिल्ह्याला २०२५ - २६ यावर्षासाठी भरीव निधी देण्याचा शासनाचा प्रयत्न राहील असे आश्वस्त उद्गार उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज येथे काढले.ऑनलाईन बैठकीद्वारे भंडारा जिल्ह्याचा जिल्हा नियोजन समितीचा आढावा त्यांनी घेतला.

यावेळी पालकमंत्री संजय सावकारे , वित्त राज्यमंत्री आशिष जयस्वाल हे ऑनलाईन पद्धतीने उपस्थित होते .तर जिल्हाधिकारी कार्यालयातून जिल्हाधिकारी डॉ.संजय



कोलते, मुख्य कार्यकारी अधिकारी, समीर कुर्तकोटी व सर्व विभाग प्रमुख सभागृह परिषद कक्षात उपस्थित होते.यावेळी बोलताना पवार म्हणाले की शासकीय इमारती इमारतींचे विद्युतीकरण हे सौरऊर्जेद्वारे करण्यात यावे .या कामाला प्राधान्य देण्यात यावे. यासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग असेल किंवा सर्व शासकीय कार्यालय विभाग प्रमुख असतील यांनी सौर ऊर्जेवर विद्युतीकरण प्रक्रियेसाठी पुढाकार घ्यावा.भंडारा जिल्ह्यातील पर्यटन विकासासाठी व तीर्थक्षेत्र विकासासाठी देखील यंत्रणांनी या दृष्टीने विचार करून विकास आराखडा सादर करावा .जल पर्यटनाला प्रोत्साहन देण्यासाठी वेगळा निधी देण्याचे त्यांनी आश्वस्त केले.यावेळी ऑनलाइन पद्धतीने नागपूर विभागीय अप्पर आयुक्त कार्यालयातून डॉ.माधवी खोडे-चवरे उपस्थित होत्या.

## स्थानिक कार्यकर्त्यांना संधी, ग्रामसभेत मिळणार विशेष निमंत्रण:राज्यभरात सुमारे १ लाख ९४ हजार विशेष कार्यकारी अधिकाऱ्यांची होणार नियुक्ती

**मुंबई**-महाराष्ट्रात आता प्रत्येक पाचशे मतदारांमागे कार्यकारी अधिकारी राहणार असून, याप्रमाणे राज्यभरात सुमारे एक लाख ९४ हजार विशेष कार्यकारी अधिकारी जिल्ह्यात नियुक्त करणार असून प्रत्येक ठिकाणी ३३ टक्के महिलांची नियुक्ती करण्यात येणार असल्याची माहिती विशेष कार्यकारी अधिकारी राज्य निवड समितीचे अध्यक्ष व महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. महाराष्ट्र सरकारने आज विशेष कार्यकारी अधिकारी नियुक्ती संदर्भातील सुधारित शासन आदेश जारी केला. त्यानुसार राज्य स्तरावर महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे हे या समितीचे अध्यक्ष आहेत. जिल्हा पातळीवर पालकमंत्री सदस्य व जिल्हाधिकारी सदस्य सचिव म्हणून काम पाहणार आहेत. आजच्या सुधारित जीआरमुळे आतापर्यंत पदावर असलेल्या विशेष कार्यकारी अधिकारीचे पद तात्काळ प्रभावाने नाहीसे होणार आहे.

महसूल मंत्री बावनकुळे म्हणाले की, हे विशेष कार्यकारी अधिकारी शोभेचे पद नसणार नाही. तर त्यांना १३ ते १४ विशेष अधिकार देण्यात येणार आहेत. आतापर्यंत प्रत्येक १००० मतदारांमागे एक विशेष कार्यकारी अधिकारी असायचा मात्र आता राज्य सरकारने नव जीआर काढून प्रत्येक ५०० मतदारांमागे एक विशेष कार्यकारी अधिकारी नेमण्याचा निर्णय घेतल्याने मोठ्या संख्येने विशेष कार्यकारी अधिकारी राज्यात नेमले जाणार आहे. लवकरच प्रत्येक जिल्ह्यातल्या निवड समितीच्या माध्यमातून नव्या विशेष कार्यकारी अधिकाऱ्यांची निवड व नेमणूक केली जाणार.अनेक महत्त्वाच्या विषयांमध्ये, विकासाच्या विषयांमध्ये, दक्षता समितीमध्ये विशेष कार्यकारी अधिकारी काम करणार असून, विशेष कार्यकारी अधिकारी शासनाच्या विविध योजनांमध्ये सहकारी म्हणून काम करणार आहे. प्रशासन आणि पोलिसांशी समन्वय साधणार आहे. या पदावरील नियुक्तीसाठी किमान दहावी उत्तीर्ण असावे लागेल.वय २५ वर्षांपेक्षा जास्त आणि ६५पेक्षा कमी असावे.शासकीय योजनांसाठी ज्या काही प्रमाणपत्र लागतात ते प्रमाणपत्र देण्याचा अधिकार या विशेष कार्यकारी अधिकारी यांना असेल तसेच विविध समित्यांमध्ये त्यांना स्थान मिळेल. सरकारच्या विविध कामांवर लक्ष घालण्याचे अधिकार त्यांना असेल.सुधारित निर्णय सरकारने केला असून, आता सरकारी सेवा व सुविधांसाठी लागणारी कागदपत्रे सुलभपणे मिळतील. जेणेकरून सरकार आपल्या दारी असल्याचे दिसून येईल. विशेष कार्यकारी अधिकारी नेमताना महिला वर्गाला महत्त्वपूर्ण स्थान देण्यात आले आहे. ३३ टक्के महिलांची नियुक्ती करण्यात येईल. तसेच राज्य सरकारच्या महत्वाच्या पाच पुरस्कार विजेत्यांनाही या पदावर नेमले जाणार आहे. या पदावरील व्यक्तीचा कालावधी पाच वर्षांचा असेल. तसेच ग्रामसभेत या अधिकाऱ्यांना विशेष निमंत्रित केले जाईल.

# महाराष्ट्रातील रेल्वे प्रकल्पांसाठी केंद्रीय अर्थसंकल्पात २३ हजार ७७८ कोटींची तरतूद

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मानले पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांचे आभार

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील रेल्वे प्रकल्पांसाठी केंद्रीय अर्थसंकल्पात २३ हजार ७७८ कोटी रुपयांची तरतूद केल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांचे आभार मानले आहेत.

यापूर्वी २००९-१४ या काळात महाराष्ट्राला वर्षाला सरासरी १ हजार १८१ कोटी रुपये मिळायचे. यंदा एकाच वर्षातील तरतूद ही तब्बल २० पटींनी अधिक आहे. २०१४ ते २०२५ या दरम्यान राज्यात दरवर्षी सरासरी १९१ किलोमीटर्सचे नवे रेल्वे मार्ग विकसित केले गेले आहेत. हे प्रमाण यापुर्वीच केवळ दरवर्षी सरासरी ५८ किलोमीटर इतके होते. २००९-१४ या कालावधीत एकाही मार्गाचे विद्युतीकरण झाले नव्हते. त्यानंतर २०१४ ते २०२५ या काळात दरवर्षी सरासरी ३२६ किलोमीटर्स मार्गांचे विद्युतीकरण करण्यात आले यामुळे महाराष्ट्रातील ३ हजार ५८६ म्हणजेच पूर्णपणे विद्युतीकरण झाले आहे.याच कालावधीत महाराष्ट्रात २ हजार १०५ किलो मीटर्सचे नवे रेल्वे मार्ग बांधण्यात आले. तुलनाच करायची झाल्यास ही लांबी मलेशियातील आता अस्तित्वात असलेल्या संपूर्ण रेल्वे मार्गाच्या लांबी इतकी होते.महाराष्ट्रात सध्या १ लाख ५८ हजार ८६६ कोटी रूपयांचे ४७ प्रकल्प प्रगतीपथावर आहेत. यातून ६ हजार ९८५ किलोमीटर मार्गाची बांधणी सुरू आहे. यामध्ये बुलेट ट्रेनसह केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजूर केलेल्या 'डेडीकेटेड फ्रेट कॉरिडॉर- डिएफसी' चार महत्वाकांक्षी प्रकल्पांचा समावेश आहे. राज्यात ५ हजार ५८७ कोटी रुपयांच्या तरतुदीतून १३२ अमृत रेल्वेस्थानकांची निर्मिती केली जात आहे. रेल्वेची कवच सुरक्षा प्रणाली ४ हजार ३३९ मार्ग अंतरासाठी कार्यान्वीत केली जाणार आहे. यातील सध्या ५७६ किमीसाठीची यंत्रणा कार्यान्वीत आहे. राज्यभरात २०१४ पासून आतापर्यंत विविध ठिकाणी १ हजार ६२ रेल्वे उड्डाण मार्ग, भुयारी मार्ग (आरएफओबी, आरयुबी) बांधण्यात आली आहेत. याशिवाय २३६ ठिकाणी लिफ्ट, ३०२ एस्कलेटर्स बसविण्यात आले आहेत. तसेच ५६६ रेल्वे स्थानकांवर वायफाय सुविधा उपलब्ध दिली आहे. याशिवाय राज्यातील ११ जिल्ह्यांसाठी उपयुक्त ठरतील अशा ११ वंदे भारत रेल्वेगाड्या सुरू करण्यात आल्या आहेत.महाराष्ट्राच्या आतापर्यंतच्या वाटचालीत रेल्वेच्या पायाभूत सुविधांमध्ये अभूतपूर्व अशी वाढ झाली आहे. यामुळे प्रवाशांकरिता सोयी-सुविधा उपलब्ध झाल्या आहेत. माल वाहतूक सुविधा सहज सुलभ आणि मोठ्या प्रमाणात सुरू झाली आहे. या सगळ्यातून महाराष्ट्र हे रेल्वेच्या नकाशावरील सशक्त आणि सदृढ राज्य बनले आहे.



# केजमध्ये कर्करोग व स्त्रीरोग मोफत आरोग्य शिबिर संपन्न;शेकडो रुग्णांनी घेतला लाभ

## शिबिरात सात रुग्ण संशयीत आढळुन आले तर दोन रुग्णांना कँन्सरची लागण



**केज । प्रतिनिधी**

दि.४ फेब्रुवारी हा कँन्सर दिवस म्हणून साजरा केला जातो या निमित्ताने केजशहरातील सामाजिक संस्था कै.अप्पासाहेब देशमुख बहुद्देशीय सेवा भावी संस्था,उपजिल्हा रुग्णालय,श्रेया हास्पिटल केज यांनी संयुक्तविद्यमाने आयोजित केलेल्या कर्करोग व स्त्रीरोग मोफत शिबिराचे उदघाटनजिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अशोक थोरात यांच्या हस्ते करण्यात आले.या शिबिरात शेकडो रुग्णांची आरोग्य तपासणी केली यामध्ये,कर्करोग,स्त्रीरोग,गुडगेदुखी,अर्थो तसेच इतर मोफत आरोग्य तपासणी व उपचार करण्यात आले या शिबिरात सात रुग्ण संशयीत आढळून आले. तसेच दोन रुग्णांना कँन्सर आढळला आहे. या शिबीरामध्ये तज्ञ डॉ. राघवेंद्र राजेश्वरकर,बार्शी मुंबई डॉ.नंदकुमार पानसे, उपजिल्हा रुग्णालयचे अधिक्षक डॉ.दत्तात्रयकेंद्रे, श्रेया हास्पिटलचे स्त्री रोग तज्ञ डॉ.योगेश्वरी थोरात (चव्हाण),डॉ.तेजस थोरात,डॉ.स्नेहा साखरे, डॉ.शितल नेहरकर, डॉ.श्रध्दा विकास मिरगणे डॉ.नागरगोजे टिम च्या उपस्थितीत शिबिर पार पडले तसेच प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक कार्यकर्तेप्रा.हनुमंतभोसले,महेश जाजू,सय्यद सादात मंत्री,सलिम शेख, जब्बार पठाण,तसेच श्रेया हास्पिटलचे सर्वकर्मचारी, उपजिल्हा रुग्णालयाचे रत्नदीप चाटे,औषध निर्माण,अधिकारी सविता सावंत हे हजर होते. आमच्या संस्थेने केले कार्याचा मोबदला आम्हाला मिळाला असुन या शिबिराच्या निमित्ताने आज नऊ लोकांना आजाराची माहीती झाली आहे.हे कर्करोग शिबिर संपुर्ण जिल्ह्यातराबवणार असल्याची माहितीसंस्थेचे सचिव पत्रकार सय्यद माजेद यांनी दिली.

आज जागतिक कँन्सर दिवसा निमित्ताने आयोजित केलेल्या कर्करोग व स्त्रीरोग मोफत निदान कार्यक्रमाचे आयोजन करुन कै. अप्पासाहेब देशमुख बहुद्देशीय सेवाभावी संस्था,श्रेया हास्पिटल आणी उपजिल्हा रूग्णालय यांनी खरच एक चांगला उपक्रम राबवून गरजवंत रुग्णांना मदत केली खर तर प्रत्येकांनी तीनमहिण्याला आपली आरोग्य तपासणी करायला पाहीजे जेणे करुन आपले आरोग्य चांगले राहील.खरच आयोजकांचं कौतुक करायला पाहीजे असे मत जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.अशोक थोरात यांनी मांडले.कँन्सर हा बरा होणारा आजार आहे काही लोकांच्या मनात आपण आरोग्य तपासणी केली तर कँन्सर निघतो की काय अशी मानसिकता लोकामध्ये झाली आणी लोक तपासणी साठी दुर्लक्ष करुन आजार वाढवुन घेतात खर तर लोकांनी न घाबरता आरोग्याची काळजीघेऊन तपासणी करुन घ्यावी असे मत बार्शी कँन्सर हास्पिटलचे डॉ.पानसे सर यांनी व्यक्त केले.

# ज्ञानदीप विद्यालयाची शैक्षणिक सहल संपन्न

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

धारूर येथील ज्ञानदीप प्राथमिक विद्यालयाची शैक्षणीक सहल ऐतीहासीक व धार्मीक व नैसर्गीक स्थळी काढण्यात आली व बालविद्यार्थ्यांना माहीती देण्यात आली. विद्यार्थ्यांनी या शैक्षणीक सहलीचा मनमुराद आनंद लुटला.

किल्ले धारूर तालुक्यातील शैक्षणिक क्षेत्रामध्ये आघाडीवर असणाऱ्या ज्ञानदीप प्राथमिक विद्यालयाची शैक्षणिक सहल नुकतीच संपन्न झाली. या सहलीमध्ये विद्यार्थ्यांना ऐतिहासिक वारसा असलेली स्थळे, पर्यटन स्थळे, किल्ले, त्याचबरोबर विद्यार्थ्यांना आनंद मिळावा यासाठी वाटर पार्क, बोटिंग, डव्हेंचर व विविध खेळणी दाखवण्यात आली त्याचा खूप असा आनंद



विद्यार्थ्यांनी या शैक्षणिक सहलीमध्ये घेतला अशा अनेक विविध ठिकाणी या सहलीचे आयोजन विद्यालयाच्या वतीने करण्यात आलेले होते. या सहलीसाठी सहल प्रमुख म्हणून शिक्षक विठ्ठल सुरवसे , अशोक अंडील , राम दराडे यांनी काम पाहीले मुख्याध्यापक शेख. एस. एन. व शैला महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली व सर्व शिक्षकवृंद यांच्या सहकार्यातून उत्कृष्ठ असे नियोजन केले होते. शेवटी आनंददायी व उत्साहवर्धक वातवरणामध्ये सहल संपन्न झाली. विद्यार्थ्यांनी मनमुराद आनंद घेतला.

# वाढत्या वयात होताहेत ज्येष्ठांचे हाल; ज्येष्ठांची हेळसांड;म्हातारपणात होतोय त्रास

**विहामांडवा । अमित पहाडे**

माणूस आयुष्यभर धनसंचयाच्या मागे धावत असल्याने याच्या नादात लेकरांवर संस्कार करण्यात कमी पडतात. यामुळे कमावलेले धनही त्यांना उतार वयात उपभोगता येत नाही. त्यासाठी दोन पैसे कमी कमवा, परंतु मुलांना संस्कारक्षम बनवा, असे अनेक वृध्दांना आता वाटत आहे. आयुष्याच्या सायंकाळी ज्येष्ठांना आधाराची गरज असताना घरातीलच लोकांकडून त्यांची उपेक्षा होत असल्याने आता काय करू साहेब, असा सवाल वृध्द मंडळी करीत आहेत.

जसजसे वय वाढत जाते, तसतसे विविध आजार जडतात. वृद्धापकाळात मुलगा, सुनेचा आधारच हवा असतो. मात्र, बऱ्याच वेळा ज्येष्ठांना समजून घेतले जात नाही. त्यामुळे रक्ताची नाती त्यांच्यापासून दुरावतात. मुलगा, सूनही लक्ष देत नाहीत.अशावेळी ज्येष्ठांना पोलिस ठाण्याशिवाय पर्याय नसतो. त्यानंतर घरच्यांच्या विरोधात तक्रार केली जाते. काही वृध्द अन्याय मुकाट्याने सहन करून आत्महत्येचाही मार्ग पत्करतात. आयुष्यात धन कमावण्याकडे लक्ष देऊन मुलांना संस्कार देण्याची वेळ गमावल्याने म्हातारपणात आपल्याच घरात त्यांना अपमान सहन करावा लागतो.

### ज्येष्ठांच्या तक्रारी काय?

**उतारवय आले की, त्या व्यक्तीचे कुणीच ऐकायला तयार नाही. आपल्या हातात पैसा असला तर मुलगा आणि सून काही प्रमाणात त्यांचे करते. पेन्शन नसलेल्या व्यक्तींची उपेक्षा मोठ्या प्रमाणात होते. सून सासू - सासऱ्यांना हिन वागणूक देते. त्या वागणुकीतून वृध्दांच्या डोळ्यात अश्रू येतात. काही सुना आपल्या सासू-सासऱ्यांना धक्काबुक्की देतात. हाताचा ठोसा मारतात. जेवण देत नाही, असा अनेक प्रकारचा छळ करतात, अशा तक्रारी आहेत.**

# संविधान अमृत वर्षानिमित्त विदर्भ विभागीय कविसंमेलनाचे आयोजन


**बीड । प्रतिनिधि**

जीवन प्रणाली प्रतिष्ठान संचलीत मानव प्रतिष्ठा सृजनता साहित्य परिषद महाराष्ट्र व्दरा चार कविसंमेलनाच्या शृंखलेतील दुसरे कविसंमेलन दि.१६.०२.२०२५ रोजी दपारी १२.०० ते सांय.५.०० पर्यत विरंगणा महाराणी दुर्गावती भवन,तुकडोजी महाराज पुतळ्याजवळ हिंगणघाट जि.वर्धा येथे आयोजित करण्यात आलेले आहे.

कविसंमेलनाचे उद्धघाटक धीमती सुषमा पाखरे (विचारवंत सुप्रसिद्ध साहित्यिक वर्धा) या राहाणार असुन प्रमुख पाहूणे धी.माजिद बेग मुगल व धी.प्रा.डॉ.गजाननसयामहे आहेत.उद्धघाटन सत्राचे अध्यक्ष धी.चंद्रप्रकाश जी.शिंदे (अध्यक्ष मा.प्र.सृ.सा.प.महा.)राहाणार असुन सुत्रसंचालन धी.सुनिल गायकवाड (सचिव मा..प्र.सृ.सा.प.महा.)आणि प्रास्ताविक धी.डी.जी.वाळवंटे (जिल्हाध्यक्ष मा.प्र.सृ.सा.प. परभणी)हे करणार आहेत. विदर्भ विभागीय मानवतावादी कविसंमेलनाचे अध्यक्षस्थान धी.योगीराज मनोहर कोचाडे (सह सचिव मा.प्र.सृ.सा.प.मह. ) भुषवणार असुन सुत्रसंचालन धी.देविलाल रौराळे (जिल्हाध्यक्ष मा.प्र.सृ.सा.प.अमरावती) व धीमती अम्रपाली पारवे(जिल्हा सचिव मा.प्र.सृ.सा.प.वर्धा)हे करणार आहेत. तर



आभार प्रदर्शन धी.रवि कोकुर्डे हिंगणघाट हे करतील . कविसंमेलनात ४२ आमंत्रित कविंचा सहभाग होणार आहे.ज्यात विदर्भ विभागातुन व महाराष्ट्रातील कांही जिल्ह्यातील नामांकित कवींचेआगमन होणार आहे.तरी साहित्यिक व साहित्य रसिकांनी उपस्थित राहावे असे नम्र निवेदन मा.प्र.सृ.सा.प.मह यांनी केले आहे.विशेषता धी.भीमराव सरवदे (उपाध्यक्ष मा.प्र.सृ.सा.प.महा.),धी. प्रोफेसर डॉ. विठ्ठल जाधव (कोषाध्यक्ष मा.प्र.सृ. सा.प.मह.),धी.प्रा.डॉ. कोंडबा हटकर(सह सचिव मा.प्र.सृ .सा.प.मह),धी.राजू वाघमारे ( सह सचिव मा.प्र.सृ.सा.प.महा.) धी,प्रा.डॉ.चंद्रकांत साळवे (संघटकमा .प्र.सृ.सा.प.महा.राज्य)धी.प्रा. आरुण कांबळे बनपुरीकर (संघटकमा. प्र.सृ.सा.प.महा.राज्य)इ. नी केलेले आहे.



चौसाळा-गुरूदत्त माध्यमिक व उच्च माध्यमिक विधालयाच्या वार्षीक स्नेहसमेंलन कार्यक्रमानिमित्त चौसाळा पत्रकार संघाचे अध्यक्ष विवेक कुचेकर यांचा ह्रदयसत्कार करताना महाविधालयाचे आदर्श शिक्षक शिवश्री बाळासाहेब जाधव सर

# आहेर वडगाव येथील माध्यमिक विद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

## क्रीडा स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांचा सत्कार

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरापासून जवळच असलेल्या आहेर वडगाव येथील माध्यमिक विद्यालयात विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळण्यासाठी वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन संस्था सचिव मा.मोरे एन.ए साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीम.गोरे एस.एस या होत्या. कार्यक्रमाचे उदघाटन श्री.प्रकाश अहिरे साहेब केंद्र प्रमुख पाली व श्री .सुशेन खरसाडे सरपंच आहेर वडगाव यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी श्री .रमेश मोरे सर ,रवी मोरे सर अभिमान रांजवण उपसरपंच, सर्व आजी माजी ग्रामपंचायत सदस्य, पोलीस पाटील, शिक्षण प्रेमी यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

सविस्तर वृत्त असे की बीड शहरापासून जवळच असलेल्या माध्यमिक विद्यालय आहेर वडगाव येथे ३१ जानेवारी रोजी वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते.यामध्ये विद्यार्थ्यांनी विविध कला , मराठी हिंदी गीतांवर उत्कृष्ट नृत्य सादर केले.तसेच बेटी बचाव ,बेटी पढाव , व्यसनमुक्ती , सामाजिक सलोखा ,असे विविध संदेश देणारे नाटिका, मनोरंजनातून सादर करत उपस्थितांची मने जिंकली. ग्रामीण भागात असलेल्या या शाळेतील विद्यार्थ्यांनी जिल्हा क्रीडा कार्यालयाच्या वतीने आयोजित विविध स्पर्धांमध्ये भाग घेतला होता.यामध्ये थ्रो बॉल स्पर्धा,धावणे स्पर्धा इ.खेळात सहभाग घेत तालुका, जिल्हा,विभागीय स्तरापर्यंत खेळ करत प्रथम द्वितीय तृतीय क्रमांक पटकावला. या मिळवलेल्या यशाबद्दल शाळेच्या वतीने मान्यवरांच्या हस्ते विजेत्या विद्यार्थ्यांचे मानचिन्ह,शाल श्रीफळ देवून सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास मोठ्या संख्येने महीला,युवक , पालक, ग्रामस्थ उपस्थित होते. तब्बल चार तास बहारदार कार्यक्रमाचा उत्कृष्ट दाद,बक्षीसांचा वर्षाव करत आनंद श्रोत्यांनी घेतला. विद्यार्थ्यांची तयारी करुन घेण्यासाठी सांस्कृतिक विभागाचे बाबासाहेब रांजवण सर , सचिन जायभाये सर , श्रीम.गायकवाड मॅडम, खामकर मॅडम,नखाते सर यांनी विशेष मेहनत घेतली. शाळेच्या वतीने त्यांचेही कौतुक करण्यात आले.कार्यक्रम यशस्वीसाठी श्री.शेख सर ,सावंत सर, गिते , सोनवणे यांनी विशेष परिश्रम घेतले.



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077